श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ९ अंक ८ | कार्तिक | शके १८५३

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... ... | १-१९ |
| श्रीसाईभक्तांस विनंति ... ... ... ... | २० |
| श्रीसंतकथामृत अध्याय ५, ६ आणि ७ ... ... ... ... | २१-३२ |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथवलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधुन तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २–८–०. फक्त २५ प्रति शिल्लक आहेत. त्या संपल्यानंतर पहिल्या ३०० पानांचें पुनर्मुद्रण करून किंमत रु. ५ निरुपायानें ठेवावी लागेल.

**रा. आ. तखंड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनी ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तखंड,

—प्रकाशक.



श्री साईंबाबांचें श्री द्वारकामाईतलें तैल चित्र

# अनुभव

श्री. म. वि. चौ. हे ठाण्याहून कळवितात:—

ता. ३–८–३१ रोजीं सकाळपासून माझी दाढ दुखूं लागली. रात्रीं ९ वाजल्यापासून ती भयंकर रीतीनें दुखूं लागली. वेदना सहन करणें अशक्य झालें! पुष्कळ उपाय केले, तरी कांहीं केल्यानें दाढेच्या वेदना बंद झाल्या नाहींत. पहांटेस ३॥ वाजले, तोंपर्यंत झोंप लागली नाहीं व वेदनाही कमी झाल्या नाहींत. पण काय चमत्कार सांगावा कीं त्याच वेळेस मला श्रीबाबांच्या हातच्या उदीची आठवण झाली. श्रीबाबांच्या छबीकडे दृष्टि गेली, आणि पेटी उघडून उदी काढली व चिमूटभर जिभेवर ठेवली. काय चमत्कार पहा! जशी वीज चमकते व त्याच क्षणीं नाहींशी होते त्याचप्रमाणें उदी जिभेवर ठेवली आणि दाढेच्या वेदना नाहींशा झाल्या! इतकेंच नव्हे, तर मी त्या गांवचा नव्हतों असें झालें!

—संपादक.

# अनुभव.

## " अरे! आपण कोण? "

श्री साईबाबा, " अरे! आपण कोण? याचा विचार करावा, " असें वरचेवर सुचवीत असत, आणि लेखकासारखीं अज्ञानी माणसें, आपल्या व्यवहारिक स्थितीवरून त्या शब्दांचा अर्थ करून आपल्या मनाचें समाधान करीत असत.

एकदा असें झालें (सुमारें इ० स० १९१५ चा मार्च महिना असावा.) कीं, आम्ही शिरडीस जाण्यासाठीं रात्रीच्या गाडीनें निघून मनमाडास दोन-अडीचाच्या सुमारास पोंचलों. तेथून दौंडची गाडी सकाळीं पांच-साडेपांचच्या सुमाराला निघत असे.

स्टेशनवर झोंप मोडून गाडीसाठीं तिष्ठत बसण्याचा मनस्वी कंटाळा येत असे. असो ! सुमारें चार वाजण्याच्या सुमारास गाडी स्टेशनवर **लागली.** गाडींत दिवेबत्ती कांहीं नव्हतें. दरवाजांना चाव्या लावलेल्या होत्या.

ते दिवस लढाईच्या धामधुमीचे होते. लष्कराच्या हालचाली सारख्या चालू होत्या. त्या दिवशीं कांहीं गोरे शिपाई व त्यांचे अंमलदार नगराला जावयाचे होते, म्हणून त्यांच्यासाठीं दोन्ही सेकंड क्लास व फर्स्ट क्लास रिझर्व्हड करण्यांत आले होते.

आम्ही मुंबईहून कोपरगांवापर्यंत सेकंड क्लासच्या तिकिटा घेतल्या होत्या, परंतु वरील कारणामुळें मनमाडास आम्हाला थर्ड क्लासमधून जावें लागलें.

स्टेशनवरच्या एका पोर्टरनें त्या काळोखांत चांचपडत थर्ड क्लासचा एक डबा उघडून दिला. त्या डब्यांत आम्ही सर्वजण शिरलों. आमच्या पाठोपाठ थर्ड क्लासनें जाणारीं इतर गोरगरीब गांवकरी माणसें घुसलीं, आणि तो डबा चिकार भरून गेला !

त्या डब्यांत त्यापूर्वींच एक पोलिसचा माणूस ताणून झोंपला होता. त्याची त्या रगडयामुळें मिजास गेली ! तो म्हणाला, "पोर्टरनें तुम्हाला डबा उघडून दिला, तर तुम्ही इतर लोकांना कां येऊं दिलेंत ?" लेखक म्हणाला, " ते आपलेच गरीब देशबंधु आहेत. थोडीशी अडचण सोसावी." यावरून तो अत्यंत गरम होऊन अद्वातद्वा बोलावयास लागला. लेखक त्याची समजूत जों जों, सौम्य शब्दांत घालूं लागला, तों तों तो अधिक भडकून शेवटीं शिव्या देऊं लागला !

लेखकाला वाईट वाटलें ! आपणास आज श्रीसाईबाबांचें दर्शन होणार म्हणून आनंद, उत्कंठा, आणि ही सकाळीं मिळणारी शिव्यांची लाखोली !

इतक्यांत बत्त्या पेटविण्यांत आल्या. त्या शिपायाचा स्पष्ट हेतु त्या गांवकरी लोकांस आपण मुंबईकरांवर देखील कसा तोरा चालवतों, हें दाखविण्याचा होता. परंतु बत्त्या लागल्यावर जेव्हां त्यानें पाहिलें कीं, ही

मंडळी सेकंड क्लासनें जाणारी आहे, त्याशिवाय त्या लष्करच्या गोऱ्या अंमलदारानें आम्हाला होणारी गैरसोय जाणून, आमच्या डब्याजवळ येऊन आदरानें आमची क्षमा मागितली, तेव्हां त्या शिपाई गडयाचें धाबें दणाणलें आणि तो गयावया करूं लागला ! त्याच्या त्या लांगूलचालन वृत्तीकडे आम्हीं स्वाभाविक रीतीनें दुर्लक्ष केलें.

त्या दिवशीं दोन प्रहरीं श्रींच्या चरगाजवळ बसलों असतां, श्रीसाईबाबा लेखकाला म्हणाले, "भाऊ ! सकाळीं तूं कोणाबरोबर हुजत करीत होतास ?" लेखकाला सकाळच्या गोष्टीची पूर्ण विस्मृति होती, इतकेंच नव्हे तर बाबांनीं हा प्रश्न विचारला त्या वेळीं तो कांहीं काळ गोंधळांत पडला ! नंतर त्याला आठवण झाली आणि तो म्हणाला "बाबा ! मी हुजत नाहीं केली !"

तेव्हां बाबा म्हणाले, "अरे भाऊ ! आपण अशा माणसांशीं बरोबरी करूं नये ! आपण कोण ! याचा विचार करावा !"

इतक्या विस्तारानें ही हकीकत लिहावयाचें कारण हें कीं, श्रीसाईबाबांचें वर्तन एखाद्या मनकवडया (clairvoyant) प्रमाणें नव्हतें.

आधुनिक विद्वान खोल विचार न करितां "Oh he is a clairvoyant" (म्हणजे, तो एक मनकवडा आहे.) असें म्हणून अशी गोष्ट ऐकल्यावर झट्कन् बोलून चुकतात.

हिंदुस्थानांत मनकवडेपणा ही एक नीच पायरीची सिद्धि, अनेक शतकांपासून ठाऊक आहे. पाश्चात्यांना आतांच सुमारें ५०।६० वर्षांपासून ही एक सिद्धि आहे असें कळूं लागल्यावरून, ते त्यावरून हुरळून जाऊन, 'मोर नाचे लांडोर नाचे,' या न्यायाप्रमाणें आपल्या देशांतली आधुनिक विद्वान मंडळी clairvoyance हा कांहीं मानसशास्त्रांतला अपूर्व शोध आहे, असें मानूं लागली आहे !

ही सिद्धि मानसशास्त्रांतली अगदीं खालच्यांतल्या खालची पायरी आहे, हें साधारण मनुष्याला देखील अभ्यासानें सहज करून येण्यासारखें आहे. स्त्रियांना ही सिद्धि थोड्याफार प्रमाणांत उपजतच प्राप्त झाली असते कीं, जेणेंकरून स्वशीलसंवर्धनार्थ ती त्यांना उपयोगी पडावी.

जर त्या वेळीं श्रींच्या पायांशीं बसलों असतां आमच्या मनांत सकाळच्या गोष्टीचा विचार आला असता, आणि श्रींनी लेखकाला वरीलप्रमाणें विचारलें असतें, तर ती गोष्ट clairvoyance म्हणजे मनकवडेपणा या शास्त्राखालीं खपली असती. लेखक स्वतः अत्यंत चिकित्सक बुद्धीचा असल्यामुळें, त्याचें मन त्यामुळें श्रींच्या चरणीं विशेष रीतीनें ओढलें गेलें नसतें.

सकाळीं घडलेल्या गोष्टीचा पूर्ण विसर असूनही जेव्हां श्रींनीं त्या गोष्टीकडे लेखकाचें ध्यान वरील जोरदार प्रकारानें खेंचलें, तेव्हां श्रींच्या खोंचदार शब्दांकडे स्वाभाविक रीत्या लक्ष जाऊन, आपला व त्या शिपायाचा दर्जा यांतल्या स्थितीची जाणीव होऊन, अशा मनुष्यांबरोबर वादावादींत पडूं नये असा त्या शब्दांचा व्यावहारिक अर्थ त्याला स्पष्ट दिसून आला.

नंतर मनाला चलन मिळालें. बाबा म्हणतात, "आपण कोण, याचा विचार करावा !" हें गूढ काय आहे ? व्यवहारिक रीत्या वरीलप्रमाणें जरी खुलासा झाला तरी त्या शब्दांतलें रहस्य कळेपर्यंत मनांत सारखें आंदोलन चालू होतेंच.

श्रीसाईमाउलीच्या शिकवणींची गम्मत ती हीच ! एक सूत्ररूपि वाक्य उच्चारावयाचें, ज्याचा व्यवहारिक खुलासा तात्काळ व्हावयाचाच, पण अध्यात्मिक खुलासाही त्या माउलीच्या अत्यंत मातृवात्सल्य प्रेरणेनें पुढें मागें व्हावयाचाच !

हें लिहितांना अतिशयोक्ति तर बाजूला राहिली ! काय लिहूं ! आणि कसें लिहूं ! त्या परम प्रिय माउलीचें गुणगान कसें गाऊं ! काय करूं ! असें होतें ! लेखणी असमर्थ असल्याची जाणीव कळून येते !

असो ! मागल्या एका अंकांत, " बाबा मला जन्ममरणांतून सोडवा !" अशी मागणी एका बाईनें केली असतां " आये ! हें ग काय मागतेस ! आपण काय मरायला आलोंत काय ? आपण कोण ? याचा विचार कर !" तेव्हां ती घोटाळ्यांत पडली असतां तिला तिच्या भ्रताराकडून खुलासा करून घेण्यास सुचविलें, आणि त्याप्रमाणें त्या उभयतांचा संवाद आपण साक्षीरूपानें ऐकला ही गोड हकीकत आली आहेच.

आपण आतां त्याविषयीं थोडा विचार करूंया. ज्ञानी जनांना पुढील लेख साहजिक कंटाळवाणा वाटेल, परंतु लेखकासारख्या केवळ अज्ञानी, अनधिकारी अशा इसमावर श्रींच्या वरील शब्दांवरून त्याच्या विचारांना जी गति मिळाली ती कदाचित् त्याच्यासारख्या इतर अज्ञानी जनांस उपयोगी होईल असें वाटून लिहिण्यांत येत आहे.

" हें घर माझें ? ही बायको, मुलें माझीं ? हें धन, दौलत, ऐश्वर्य माझें ? " असा आपल्यापाशीं प्रश्न केला असतां आंतून व्यवहारिक उत्तर येतें, " होय ! " म्हणजे " **मी** " या सर्वांहून निराळा !

बरें पुढें, " हें माझें शरीर ? "

" होय " पण " **मी** " तर याहून निराळाच !

" हें माझें मन ! ही माझी बुद्धि ! हा माझा विचार ! सर्व खरें ! " **मी** " यांहून निराळाच. "

" कां ? "

" माझें " म्हणून.

" म्हणजे ? "

" अहो, जी वस्तु माझी, त्या वस्तूपासून " **मी** " भिन्न म्हणजे निराळा ! असें **व्याकरणशास्त्र** अनुभवांतीं शिकवतें ना ? "

याप्रमाणे पाहातां " माझा जीव" म्हणजे " जीवा " हून " **मी** " निराळा ! हें चमत्कारिक वाटतें खरें; कारण, हा देह ज्या वेळीं पडेल म्हणजे

मृत होईल, त्यावेळीं "माझा जीव" त्यांतून निघून जाईल. म्हणजे "मी" त्या "जिवाला" बरोबर घेऊन जाईन; कारण तो "माझा" आहे.

आतां "माझा देव" म्हटलें कीं "**मी**" आणि "देव" निराळे असें म्हणावें. लागतें "माझा देव" म्हणजे **देव माझ्या मालकीची गोष्ट.**

आपल्या अर्वाचीन शिकवणींप्रमाणें देवाची कल्पना Cosmic Energy (म्हणजे जग निर्माण करणारी शक्ति) म्हणजे जगज्जननीपर्यंतच जाऊं शकते. पण त्यांत मुख्य फरक हा कीं, आपल्या दृढ समजुतीप्रमाणें ही जगज्जननी भक्तिभावानें भक्ताच्या इच्छेप्रमाणें साकार रूप घेते. म्हणून ती साकार आहे, निराकार पण आहे. इतकी मजल पाश्चात्यांच्या भावनेंत मुळींच दिसून येत नाहीं. त्यांना तिच्या भौतिक लीलांखेरीज दुसरें कांहीं दिसून येत नाहीं. त्यांची अध्यात्म दृष्टि बहुतेक शून्य !

ही जगज्जीननीची शक्ति सर्व ब्रह्मांड व्यापून आहे. आपल्या आंत-बाहेर सर्व प्रकारें परिपूर्ण आहे. असें जर आहे तर आपल्या शरीराची खरी मालिक हीच Cosmic Energy अथवा जगज्जननीच आहे. तिनें आपलें चैतन्य काढून घेतल्या क्षणींच शरीर मृत होतें.

याप्रमाणें या शरीरांतील खरी मालीक जर जगज्जननीच आहे तर "मी" आणि माझा "जीव" या दोन निराळया **गोष्टी निराळ्या** गोष्टी, अथवा वस्तु अथवा प्रकार, या शरीरांत कशा राहूं शकतील ?

श्रीजगज्जननीनें दिलेल्या भावनांतून "**मी**" अहंकार शरीरांत उत्पन्न होतो. जागृत अवस्थेंत या भावनेचें रूप जगज्जननी ही माता व "**मी**" हें तिचें लेंकरूं, असें असतें. म्हणून तिची प्रार्थना आणि तिच्याशीं **वात्सल्य-रूपि विचारांनीं** लाडीगोडी, रुसणें, फुगणें वगैरे.

तिनें दिलेल्या इंद्रियरूपि खेळण्यांमुळें आपलीं सुखदुःखें. या खेळण्यांचा कंटाळा येऊन "आई" म्हणून प्रार्थनेनें, भजनानें, अथवा प्रेमपूर्वक भावनेनें जेव्हां तिला हाक मारावी, तेव्हां तिनें कृपाळू होऊन आनंददायक अनुभवयुक्त अशी त्या हाकेस "ओ" द्यावी त्या वेळीं "**मी**" व "**जीव**" एक होतात.

जसें आईनें मुलाला कडेवर घेणें, म्हणजे भिन्न असून उभयतांचा आनंद उभयस्पर्शी असतो.

त्या स्थितीनें ही तृप्त न होतां तें " मी " व " जीव " एकरूपि झालेलें बालक " आईच्या " कंठाला प्रेमानें मिठी मारतें, आणि तीही तशाच प्रेमानें त्याला हृदयाजवळ घट्ट कवटाळून धरते; त्या वेळीं त्या उभयतांची स्थिति अशी असते कीं, तें बालक आपलें " मीपण " विसरतें आणि ती " जगज्जननी " आपलें अगाध, अगम्य, थोरपण विसरते. त्या वेळीं " मी कोण, " "आपण कोण" या श्रीसाईमाऊलीच्या शब्दांचा उलगडा होऊन जो आनंद होतो त्याचें वर्णन **शब्दांनीं** होणें शक्य नाहीं.

**पाश्चात्यांच्या शिकवणीत हें मिळावयाचें नाहीं.** हा ठेवा आपल्या ऋषिमुनींनीं, आपल्या साधुसंतांनीं, आपल्यासाठीं ठेवलेला आहे. कितीही लुटून घेतला तरी त्यांत कधींही खूट पडावयाची नाहींच.

हा आनंद अनुभवणें हें प्रत्येक " मी " म्हणणाऱ्या मनुष्याच्या अहंकाररूपि भावनेचें, अंतिम ध्येय आहे. या ध्येयासाठीं, जाणा किंवा न जाणा प्रत्येक " मी " म्हणणाऱ्या जीवाची हीच धडपड आहे. यासाठींच आपणा संसारत्रस्त स्त्रीपुरुषांसाठीं श्रीसाईमाउलीची शिकवण कीं, " आपण कोण !" याचा विचार करून अनुभव घ्यावयाचा. हाच " स्वानंद " कठीण वाटतो पण अभ्यासानें तो साध्य होण्याजोगा आहे. रानांवनांत जाणें नलगे.

शेवटीं ज्या जगन्माउलीची आपण पूजाअर्चा करून जीवन आनंदानें अनुभवीत आहोंत त्या श्रीसाईमाउलीरूपि साक्षात् " महालक्ष्मीच्या " पदीं तिचें अज्ञानी बालक हा आवडधोवड लेख सादर करून, तिला प्रार्थीत आहे कीं, " माय माझी तूं ! या तुझ्या अनंत अफाट लीलांमध्यें तुझ्या बाळ-गोपालांना, खेळण्यांत गुंग झाली आहेत तरी, विसरूं नकोस. सर्वांच्या हृदयांत तूं सर्वस्वी परिपूर्ण बसलेली आहेस; अशी तूं अनंतकोटि ब्रह्मांडें खेळविणाऱ्या स्वामिनी, तूं हृदयस्थ असून, आम्ही तुझीं बालकें दीन असूं, हें तुला कधींही उचित असणार नाहीं. तर माते ! आतां विलंब लावूं नको !

आम्हाला धीर दे! हा संसारसागर तुझ्या इच्छेनुरूप तरून जाण्यासाठीं आम्हाला पूर्ण सामर्थ्यवान् कर. तुला विसरून जाणाऱ्या पाश्चात्यांच्या शिकवणींची छाया आमच्या मनांवर पडूं देऊं नको. तुला विसरणारी अनेक राष्ट्रें उच्च स्थितींतून कोसळून पडलेलीं इतिहास शिकवीत आहे. तूं भाकीत केल्याप्रमाणें, आणि तुला विसरल्यामुळें जागोजाग "लोक एकमेकांना फाड फाडावयास लागले आहेत!" म्हणून हे करुणामयी! हे आनंदमयी माते! आमचें हिंदुत्व उसळून, तुझीं हीं नम्र बालकें जगाला आदर्शवत् होऊं, अशीच स्फूर्ति व शिकवण दे. हीच आमची तुझ्या दिव्य पायांपाशीं सतत प्रार्थना, व दृढ हट्ट; कारण हे साईमाउली तुझ्या चरणांजवळ "आपण कोण?" हें जाणण्याचा हट्ट न धरावा तर कुणाजवळ!

"म्हातारा"

## अनुभव

या अंकासोबत श्रींच्या द्वारकामाईतल्या तैलचित्राच्या छायाचित्रावरून केलेल्या ब्लॉकवरून छापलेलें चित्र देण्यांत येत आहे.

या पुण्यतिथीच्या प्रसंगीं कोण्या एका गृहस्थानें श्रींच्या समाधीवरील तसबिरीच्या कांचेवर बाहेरून काळी दाढी वगैरे रंगवून, श्रींना शंकराचें रूप देण्याचा कांहीं तरी प्रकार केला होता, जो सेवकाला आवडला नाहीं. तथापि त्यानें त्या देखाव्याच्या काळजीपूर्वक चार नेगेटिव्ह घेतल्या. त्या फिल्मवर एकंदर सोळा नेगेटिव्ह होत्या. त्यांपैकीं वरील चार नेगेटिव्ह साफ खराब झाल्या. श्रीम्हाळसापतीच्या समाधीच्या जागीं अंधेर असूनही त्या समाधीचें छायाचित्र चांगलें निघालें आहे व त्याचा ब्लॉक होऊन पुढील एखाद्या अंकीं त्याचें चित्र प्रसिद्ध होईल.

वरील फिल्म मे. प्रभाकर ब्रदर्स यांजकडे डेव्हलप करण्यासाठीं देण्यांत आली होती, आणि त्यांनीं त्यांच्या हमेशाच्या काळजीपूर्वक पद्धतिप्रमाणें ती तयार केली होती; तरी त्या फिल्मच्या सोळा नेगेटिव्हपैकीं या चार नेगेटिव्ह कां खराब व्हाव्या हें श्रीसाईबाबाच जाणे.

वांद्रें, ता. २३–१०–३२. रा. आ. तर्खड.

# अनुभव

## ॐ श्रीसाईनाथायनमः

श्रीनाथाश्रम नं. १०, पारलें.

श्रीयुत बाबासाहेब तर्खड यांसी शामराव जयकरचा साष्टांग प्रणिपात. लिहावयास कारण कीं, आपल्या श्रीसाईलीलेंत जागा असल्यास माझ्या अल्पमतीप्रमाणें साईमाउलीनें दिलेला अनुभव आपणापुढें मांडतों. तो आपणास पटल्यास केव्हांही प्रसिद्ध करावा. अमकीच वेळ असावी असा कांहीं आग्रह नाहीं.

सन १९१७ जूनमध्यें एक दिवस रा. रा. तात्या पाटील कोते हे मशिदींत येऊन श्रीसाईबाबास विनंति करूं लागले कीं, " कोपरगांवच्या कोर्टांतून साक्षीसमन्स आलें आहे, व दहा वाजतां मला हजर राहावें लागेल; म्हणून मी जातों. आज्ञा असावी. " श्रीसाईनाथांची लीला अगाध, त्यांनीं सांगितलें कीं, " जाऊं नको. " हे शब्द ऐकल्याबरोबर तात्या पाटलाची बोबडीच वळली ! कारण मला पाटलानीं स्वतः सांगितलें होतें कीं, बाबानीं जाऊ नको असें सांगितलें असतां दोन वेळ मी हट्टानें कोठें दूर कांहीं कामासाठीं गेलों असतां दोन्ही वेळ अर्ध्या वाटेंत मरतां मरतां वांचलों, व त्या वेळापासून कानचिपली घेतली कीं, बाबांनीं, नको जाऊं असें म्हटलें कीं मग शिरडींतून बाहेर जावयाचें नाहीं, व त्याप्रमाणें श्री साईनाथांनीं कोर्टांत हजर होऊं नको अशी आज्ञा केली म्हणून जावयाचें नाहीं.

हें सर्व ठीक, पण कोर्टाचा हुकुम तोडल्यास हातांत बिडया जरूर पडणार हें फक्त पाटील जाणत होते ! वेळ थोडा राहिला, व बाबा जाऊं नको म्हणतात. अशी त्यांची पांचांवर धारण बसली. तेव्हां सवड काढून डॉ. पिले बाबाजपाशी गेले व हकीकत सांगितली व गयावया करून श्रीसाईमाउलीस कांहीं तरी समजावून सांगा असें म्हटलें. आतां डॉ. पिले श्रीसन्निध सतत रहाणारे,

व श्रींनीं त्यांना "भाऊ" असे प्रेमाचें टोपण नांव दिलें; शिवाय, माझें व डॉ. पिले यांचें बरेंच रहस्य जमत असे, तरी वरील तात्या पाटलाच्या बाबतींत तेही चकले, व म्हणूं लागले कीं, "बाबांना सांगा कीं, हें कोर्टाचें काम आहे, न गेल्यास हातांत बेडया पडतील, तरी श्रीसाईनाथाचें एकच उत्तर कीं, "जाऊं नको."शेवटीं पाटील तर गेला नाहींच पण रामचंद्र पाटलाला डॉक्टरचें सर्टिफिकेट देवून पाठविला. तो जावून पाहातो तों कोर्ट आज बंद आहे अशी नोटीस दरवाजावर लाविलेली दिसली ! त्यानें परत येऊन सर्व हकीकत सांगितल्यावर प्रत्येक जण म्हणूं लागला कीं, सत्य आहे, बाबांना सर्व कांहीं आधींच कळतें. आणि आम्ही वर्षानुवर्षे त्यांजपाशीं राहून व्यर्थच होय !"

स. १९१७ सालीं माझा मुलगा चि. सुरेंद्र हा टॉयफाइड व निमोनियानें ऐशीं दिवस सीक होता व एकंदरींत रुग्णावस्थेंत पांच डॉक्टर झाले. शेवटीं यश येऊन तो बरा झाला. पण सर्वकाळ साईमाउली त्यांच्या ब्रीदवाक्याप्रमाणें आमच्यापाशीं सत कशी होती, ते अनुभव बरेच आहेत. त्यांतून एक देतों. (ब्रीदवाक्य कसें तर मी कांहीं महिने त्यांच्यापाशीं एकटाच होतों; पण लक्ष सारें मुंबईंत ! मुलें-माणसें एकटींच आहेत व माझ्याशिवाय कधींही एकटीं न राहिल्यामुळें त्यांचें कसें होईल ही काळजी; तरी हें जाणून साईनाथांना जेव्हां जेव्हां मंडळी विचारीत कीं, 'जयकरला रजा केव्हां देणार ?' ते म्हणाले, "देऊं आतां दोन चार दिवसांनीं; त्याच्या माणसांचें तिथें चांगलें होईल: त्याला कांहीं जाण्याची जरूर नाहीं," असेंही म्हणावें. तरी काकासाहेब व माउली आदि मंडळी विचारीत असत, तेव्हां एक वेळ म्हणाले कीं, बरें जात असेल तर जाऊंद्या; कोठेंही गेला तरी मी त्याच्याजवळच आहे.) चि. सुरेंद्र रुग्णावस्थेंत असतांना साठ दिवस झाले होते व थोड थोडा उतार पडत होता. बाकी अस्थिचर्माशिवाय कांहीं राहिलें नव्हतें. तेव्हां रोज दुपारीं त्याचें पोट वाऱ्यानें चढून येई. डॉक्टरला विचारलें त तो म्हणें कीं, 'असें कां होतें तें कळत नाहीं.' तेव्हां काय करावें तें सुचेना असें होतां होतां एक दिवस दुपारीं पोट इतकें चढलें कीं, चि. सुरेंद्र फारच

घाबरला व " नानाजी, आतां मला सांभाळा'' असें दोनतीनदां काकुळतीने येऊन व मोठ्यानें म्हणूं लागला. तेव्हां माझा धीर सुटला व आतां मुल हातांतून चालला असें वाटून मीं मोठ्यानें श्रीसाईनाथांस "साईबाबा" अशी मोठ्यानें हांक मारली. तों चमत्कार असा कीं, चि. सुरेंद्राचें पोट हळू हळू उतरून त्याला फार बरें वाटलें व पुनः तसें चढलेंच नाहीं. ही केवढी कृपा ! पण त्याचा मोबदला माझ्याकडून कांहींसुद्धा दिला. गेला नाहीं मी सर्व लिहितों, पण कसें लिहितों तें माउलीलाच कळे.

ह्या मुलाच्या आंदगीमध्यें आणखीही अनुभव दिले ते दुसऱ्या खेपेस लिहीन. मात्र त्या वेळीं, रात्रंदिवस ह्या मुलाच्या उशापाशीं निजत असें त्याच गादीवर पहाटेस बाबांच्या आरत्या वगैरे सर्व म्हणे. हींच काय ती सेवा ! मला गाण्याचा फार नाद असल्यामुळें त्या भूपाळ्या गातांना आनंद होई व सेवाही घडे. कळावें.

सन १९१६ सालीं आश्विन महिन्यांतली गोष्ट. श्रीसाईनाथ आमच्या वर कृपादृष्टि ठेवून योग्य शिक्षण कसे देत होते तें पाहा. रावबहादूर प्रधान यांची ओळखही विचित्र तऱ्हेनें झाली व त्यांनीं माझ्यासंबंधीं फारशी चौकशी न करतां व किमतीसंबंधानें कांहींही घासाघीस न करतां एकदम सात आठ तसबीरींची आर्डर दिली व मी माझ्या कामांत त्यांना पूर्ण संतोष दिल्यावर मी पुण्यास जाण्यास रजा मागितली; पण येथेंच तर साईमाउलीचे पाताळयंत्र चालू होतें माझा व त्यांचा पूर्वापार संबंध होता हें मला माहित नव्हतें तर इतरांस कोठून कळणार ? पण माता लेकरांस थोडेंच विसरते ! तेव्हां प्रधानसाहेब काय म्हणतात कीं तुम्ही आतां जा, पण पुण्यास गेल्यावर जर तुम्ही शिरडीस जाऊन बाबांची तसबीर काढून आणाल तर मी घेईन. मी देखील कांहीं विचार न करतां ठीक म्हटलें; पण घरीं आल्यावर विचार केला कीं शिरडी कोठें आहे व कांहीं पत्र वगैरे न देतां मला जाण्यास सांगितलें, पण आपला कोणाचा तेथें परिचय नाही तर रहावयाचें कोठें व खावयाचें काय, असलेच विचित्र विचार मनांत आले व साईबाबांचे फोटो मी पाहिले होते. म्हणून मीं म्हटले त्यांत काय

आहे, एका फकिराची तसबीर काढायची, ही गोष्ट कांहीं कठीण नाहीं व तो फकीर फोटोवरून पाहातां सुंदर तर नाहींच, पण कुरूप आहे. तेव्हां फार कठीण गोष्ट नाहीं. असो.

दोन तीन दिवसांनीं विचार ठरला कीं, ठीक आहे, जाऊंया तर खरे. तेव्हां मीं माझ्या मामास म्हणजे हल्लीं कै. रा. रा. बाबासाहेब रसूल ह्यांस रा. काकासाहेब दीक्षितांवर एक पत्र देण्यास सांगून व तें पत्र घेउन मी शिरडीस गेलों व धूलिवंदनास मशीदींत गेलों तो श्रीसाईनाथांचें रूप पाहातच राहिलों ! ते तेजस्वी पाणिदार नेत्र व गुलाबी गाल पहातच राहिलों ! ते मजकडे पाहातात व मी त्यांजकडे पाहातों. काकासाहेबांना चिठी दिली; ते वाचीत होते, पण मी वेडयासारखा साईनाथांकडे पाहातच राहिलों. इतक्यांत सर्व मंडळीस खालीं जाण्यास हुकुम झाला, पण मजपाशीं रा. रा. माधवराव देशपांडे येऊन माझ्या हातीं चवरी दिली व म्हणाले, "तुम्ही येथेंच आरती होईतों राहा व सेवा करा." मला किती आनंद झाला असेल तो पाहा ! मशीदींत पाय ठेवतांच सेवा मिळाली. त्या वेळेस गर्दीही बरीच होती. झालें फोटोवरून तसबीर काढून देण्याचा बेत अजिबात पालटला व प्रधानसाहेब त्या फोटोंत बाबांचें स्वरूप कसें पाहातात तें कळेना. मी मात्र साफ फसलों असतों. असो. मीं मग श्रीसाईनाथ जसे बसले होते तसाच त्यांचा स्केच कोणाच्याही नकळत घेण्याचा विचार ठरवला व त्याप्रमाणें करून घरीं आलों.

घरीं आल्यावर तीन तसबिरा तीन तऱ्हेच्या करून सांताक्रूझला प्रधानसाहेबांकडे घेऊन गेलों. तसबिरा पाहून ते स्वतः व घरची बायका मंडळी व मुलेंही फार खूष झालीं व प्रत्येकानें श्रीसाईनाथांस मनोभावानें साष्टांग प्रणिपात केला. किती ही भक्ति ! पण सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, महात्मा गांधी आज एक तपाच्या वर लोकांना कळकळीनें सांगतात कीं, एकी करा पण रावबहादुराच्या घरांत जी एकी मीं पाहिली व अजून पाहातों ती मला अजून कोणाच्याही संसारांत दिसून आली नाहीं. ही ईश्वरी कृपा केवढी आहे तें अनुभवाशिवाय कळणार नाहीं. असो. आतां तसबिरी तीन्ही घ्याव्या कीं दोन घ्याव्य हा

खल होऊन त्यांतून दोन ठेवल्या. ऑर्डर एकाच तसबिरीची होती व तिसऱ्या तसबीरीची व्यवस्था जर खुद्द साईनाथांनीं निराळीच ठरविली होती तर तीन्ही तसबिरी ठेवून घेण्याची स्फूर्ति प्रधानसाहेबांस कोठून होणार ? झालें ! व्यवहार चोख ! रुपये पद्रांत बांधून मी मुंबईस आलों तों एक गृहस्थ तेथें हजर होते त्यांना ही बातमी कळली. त्यांच्या विनंतीवरून त्यांना ती तिसरी तसबीर दाखविली आणि त्यांनीं लागलेंच सांगितलें कीं, "तसबीर बरोबर नाहीं व बाबांचा चेहरा ओळखत नाहीं."

मीं त्यांना कांहीं जबाब दिला नाहीं, परंतु माझे मामा तेथें हजर होते त्यांना सांगितलें कीं, रा. मोरेश्वरराव प्रधान हे पूर्ण व्यवहारी आहेत व त्यांनीं एका ऐवजी दोन तसबिरी ठेवून घेवून पैसे चुकते केले, ते कांहीं माझ्या कोठल्या रीतींनें ओशाळगिरीत नव्हते व नाहींत. शिवाय तसबिरी त्यांनी एकटयानीं पसंत केल्या नसून सर्व मंडळीनें पसंत केल्या आहेत. पुढें मी ती तसबीर घेऊन शिरडीस गेलों. पण मशीदींत साईनाथांस ती दाखविण्याचा धीर होईना ! शेवटीं सायंकाळीं चार वाजतां रा. रा. माधवराव आले व ती तसबीर घेऊन मला मी नको नको म्हणत असतां मशिदींत माझ्यासह गेले. तों बाबा मशिदींच्या पायऱ्यांवर बसले होते. आम्हाला पाहिल्यावर आम्ही दारांत जातां तांच "काय शामा, काय आहे," असें मोठयानें म्हणाले. लागलीच तसबीर त्यांच्या हातीं दिली ती घेऊन हांसत हासत, "जा, काकाला सांग ही बंगल्यात टांगा," झालें ! त्या गृहस्थाचे बोल खोटे ठरले.

पार्ले, ता. १५ सप्टेंबर १९३२. **शामराव रामचंद्र जयकर.**

# अनुभव

## श्रीसाईबाबा प्रसन्न

आरवी येथील काम पुरें झाल्यावर आम्हीं पाचोरा येथें आलों. तेथें संत्रें व पोफई चांगलीं मिळत असत. आम्हीं ३०० संत्रें आणली होतीं. त्यांपैकीं चांगलीं व मोठीं संत्रें निवडून बाबांच्याकरितां ठेविलो आणि २ करंड्या मुंबईस पाठविल्या. ५० संत्रें आणि एक पोफई मिळून एक करंडी भरून ठेविली. रात्रीं नैवेद्याकरितां २ संत्रें फोडलीं तेव्हां त्यांपैकीं एकांत ११ फोडी निघाल्या व दुसऱ्यांत १२ फोडी निघाल्या. त्या वेळीं मी म्हटलें, "ही एवढीं मोठीं संत्रें असतांना ह्याच्यांत ११ च फोडी निघाल्या." तेव्हां मला त्यांनीं म्हटलें, "तुझ्या बाबांना संत्रें फारच आवडतात तेव्हां जातांना थोडीं घेऊन जा." तेव्हां मी म्हटलें, "आपण सांगावयाच्या अगोदरच मी ५० संत्रें आणि १ पोफई घालून करंडी भरून ठेविली आहे." आरवीला मोगऱ्यांचीं व गुलाबांचीं फुलें फारच सुंदर मिळत असत. मी एक सुरेख हारही तयार केला होता. दुसरे दिवशीं मी शिरडीस जावयास निघालें व पहिल्यानें मनमाड स्टेशनवर उतरलें. नंतर दुसऱ्या गाडींत बसून ५ वाजतां कोपरगांव स्टेशनवर उतरलें. नंतर ८॥ वाजतां टांगा करून बाबांच्याजवळ पोंचलें. मला बाबांच्याकडे जाऊन १ एक वर्ष होत आलें होतें, त्यामुळें बाबांना बघण्याची फारच उत्कंठा लागली होती. पण ती वेळ बाबांची लेंडीवर जावयाची होती. म्हणून मोठ्या घाईनें बाळाभाऊ यांच्याकडे सामान टाकून तडक मशिदीवर गेलें. मोठ्या प्रेमानें बाबांना जाऊन भेटावें. इतक्यांत पायरीजवळ एक चोपदार उभा होता. त्यानें "मत जाव!" म्हणून सांगितलें. ते चोपदार म्हणजे साठेसाहेब होय. त्यांनीं हुकुम फर्माविल्याबरोबर मी सभामंडपाच्या खांबाजवळ बसलें. मी बाबांच्याकडे पाहिल्यावर मला प्रेमाश्रु आले आणि बाबा माझ्याकडे १० मिनिटें पाहात होते. तेव्हां साठेसाहेब म्हणाले, "बाई! आतां बाबा बाहेर येथील तेव्हां त्यांचें दर्शन घ्या." त्या वेळेस मी त्यांना असें उत्तर दिलें कीं, "साठेसाहेब आतां तुम्ही माझ्याजवळ मुळींच बोलूं नका." नंतर बाबांच्या जवळ न जातां मी त्यांच्या मागोमाग भिमाबाईच्या दारापर्यंत गेलें. तेथें बाबा

एवढेंच बोलले कीं, " मी बाईचीच वाट पाहात होतों. " माझ्याजवळ कांहींच बोलले नाहींत, व माझ्या डोळ्यांचे प्रेमाश्रु खळले नाहींत. अंग धुणें वगैरे झाल्यावर पूजेचें सामान घेऊन मशिदींत गेलें. पुढें बाबांच्या जवळ न जातां बापूसाहेबांनाच पूजा करावयास सांगितली; व हारही घालावयास सांगितला. तेव्हां बाबा म्हणाले, " वडे बाबा ! आरवी येथें फारच सुंदर गुलाब होतात. संत्रें व पोफईसुद्धां फारच सुरेख मिळतात. माझ्यासाठीं आणलेलीं संत्रें व पोफई बाळाच्या घरींच राहिलीं, " आणि रात्रीं घडलेली सर्व हकीकत सांगितली. तें ऐकून मला प्रेमाश्रु आले. पण मी त्यांच्याजवळ गेलें नाहीं. सर्व बोलणें शांतपणें ऐकलें आणि आरती झाल्यावर बिऱ्हाडीं परत आलें. परत आल्यावर मला वर कां जाऊं नको असें सांगितलें हा विचार परत मनांत आला आणि जेवण वगैरे कांहीं रुचलेंच नाहीं. मी पांच वाजल्यावर धुणी-पुढें जाऊन उभी राहिलें. सर्वांना उदी देऊन झाल्यावर जावयास सांगितलें. मी मात्र हाललें नाहीं.तेव्हां बाबा स्वतः हातांत उदी घेऊन आले आणि "बाई ! तूं केव्हां आलीस, " असें विचारलें आणि खांद्यावर हात टाकून पायरीवरून खालीं उतरले. नंतर मीं खांद्यावरून मान काढली आणि घट्ट पाय धरले. नंतर जातांना " ठकूताई, वाड्यांत जाऊन बसा, " म्हणून सांगितलें. आपण ह्या लोकांच्या नादीं लागूं नये. नंतर घरीं जाऊन स्वस्थ पडलें. तरी मला पहाट कधीं होईल हीच चिंता लागली होती. रात्रीं एक स्वप्न पडलें तें असें:--- " भोपळ्याच्या पुऱ्या क़रून घेऊन ये. " तेव्हां मी पहाटे उठलें. पुऱ्या आणि चटणी करून न्याहारीच्या वेळेस घेऊन गेलें. त्या दिवशीं बाबांना फारच ताप आला होता. तरी पण थोडी चटणी आणि एक पुरी खाल्ली व वडे बाबास सांगितलें, " आज मात्र माझ्या तोंडाला चव आली. " नंतर १० वाजतां ७ संत्रें आणि एक पोफई घेऊन गेलें. बाबांनी पूजा केली आणि धुणीपुढें जाऊन उभी राहिलें. बाबाला संत्रें फोडावयास सांगितलीं. तेव्हां प्रत्येकांत ११ च फोडी निघाल्या. आपण दोन फोडी खाल्या आणि बाकीच्या वांटावयास सांगितल्या.

नंतर " भक्तांचें प्रेमच तसें ! " हें वाक्य ते उद्गारले. नंतर पोफई फोडावयास सांगितली. एक फोड मला दिली आणि बाकीच्या सर्वांस वाटल्या.

मंडळी वरीच असल्या कारणानें बाबांच्या वांटणीस एकही फोड राहिली नाहीं. मी ती फोड घेऊन तशीच उभी होतें. "ती फोड तूं खा !" असें सांगितलें. "आपण अगोदर खा नंतर मी खाईन असें सांगितलें." तेव्हां त्यांनीं अर्धी खाल्ली व अर्धी मला दिली. तेव्हां भीमाताई म्हणल्या "आपल्या लाडक्या लेकींचें मात्र सर्व ऐकतां !" तें पाहून बाबा म्हणाले, "ठकूताई कोणाच्या वाटेला जात नाहीं, आणि तिच्या वाटेला कोणी गेलें म्हणजे मात्र नयेसारखी भिसटया उपटते !"

हें वाक्य ऐकून बडे बाबा म्हणाले "चंद्राताई आधीं कोणाच्या वाटेस जात नाहीं. तिच्या वाटेस कोणी गेलें म्हणजे मात्र तिला राग येतो."

बाबांना फार ताप असल्या कारणानें त्यांचे डोळे लाल झाले होते; तें तें पाहून माझे डोळे आसवांनीं भरून आले, आणि बाबांच्या पायांवर मस्तक ठेवून "माझे आई ग !" असें म्हटलें तेव्हां बाबा म्हणाले, "मी तुझा आई-आणि बाप दोन्ही आहे.

मी त्यांच्या शेजारीच बसून होतें. तेव्हां त्यांनीं मला परत एकदा सांगितलें कीं, "आपण कोणाच्या वाटेस जाऊं नये आणि असे लढुं नये. श्रीराम म्हणत बसावें." ११ वाजतां मंडळी यावयास निघालो. तेव्हां बाबांनीं "ठकूताई" अशी हाक मारली आणि "वाडयांत जाऊन नानास येऊं नको असें सांग," असें म्हणाले. तेव्हां मी म्हटलें, "बाबा, अजून नाना आले नाहींत." तेव्हां बाबा म्हणाले, "आले आहेत तूं जाऊन सांग." नंतर मी घाईघाईनें वाडयाकडे जावयास निघालें. तेव्हां रस्त्यांत मला काकासाहेब भेटले. ते म्हणाले, "चंद्राताई, नानासाहेब आजून आले नाहींत." तेव्हां "परत चला." मी म्हटलें, "बाबांचीं वाक्येंच खरीं आहेत. त्यासाठीं मी वाडयापर्यंत जाणार." साठेसाहेबांच्या बंगल्यांतून बाहेर पडतें तोंच नानासाहेबांचा टांगा काकासाहेबांच्या बंगल्यापुढें थडकला ! त्यावेळेस सर्व मंडळी आरतीला गेली होती, आणि आप्पा नैवेद्याचें ताट घेऊन मशिदीकडे चालला होता.

तोंच घाईघाईनें बाबासाहेब उतरले व मला एवढा उशीर झाला असें म्हणाले. तेव्हां मीं त्यांना सांगितलें, " बाबानीं आपल्याला मशिदींत न येतां वाड्यात बसावयास सांगितलें आहे. " तेव्हां ते हंसत म्हणाले, " तो नाना मी नव्हे. त्यांचा नाना निराळाच आहे. नंतर बाबांच्या नानाविषयीं चौकशी करून मी आलों तर ते माझ्यावर रागावतील का ? मला तर त्यांच्या दर्शनाची उत्कंठा लागली आहे. " तेव्हां, " तें तुमचें तुम्ही पाहून घ्या " असें उत्तर देऊन मी घाईनें मशिदींत गेलें.

आरतीची वेळ झाली. इतक्यांत नानासाहेब आले. सर्व संपल्यावर मंडळी निघून गेली. नानासाहेब आणि थोडी मंडळी मात्र होती. नंतर नानासाहेबांनीं बाबांच्या पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां " नाना! तूं आलास का?" असें विचारलें. " मी तुला वाड्यांत बसावयास सांगितलें होतें. पण बरें झाले. माझी पाठ आणि पोट दुखत आहे. "

तें ऐकून नानासाहेब म्हणाले, " आणखी थोडे आपण मशिदींत राहावें अशी माझी इच्छा आहे. तेव्हां नामस्मरणाचा सप्ताह चालवूं का ?" असें विचारलें.

तेव्हां बाबा म्हणाले, " आधीं भाऊला बोलावून आण. " तेव्हां नानासाहेब वाड्यांत निघून गेले आणि चार पत्रें व ३ तारा लिहून आणाल्या. त्यांना बाबांनीं हात लावला व " पाठवून दे " असें सांगितलें. ती पत्रें दोनच्या टपालांतून रवाना झालीं. नंतर सर्व मंडळी काकासाहेबांच्या बंगल्यावर जमा झाली होती. त्या वेळेस गुरुवारपासून नामस्मरणाचा सप्ताह सुरू करावयाचा असें ठरलें. नंतर जेवणाच्या व्यवस्थेसाठीं लडु बाण्याला सामानाची वर्दी दिली. ह्याप्रमाणें सर्वांना कामें वांटून दिलीं. पण मला वेडीला मात्र कोठीवरचें काम दिलें. तें पाहून मीं त्यांना सांगितलें, " मी आधीं बाबांना विचारीन आणि नंतर घेईन. " दुसऱ्या दिवशीं मीं बाबांस सांगितलें कीं, " नानासाहेबांनीं मला कोठीवर बसावयास सांगितलें आहे. " बाबांची लीला अद्भुत " अल्ला वाली आहे. " एवढेंच त्यांनीं सांगितलें. नंतर मी कोठीवर जाऊन बसलें. तें सर्व सामान जेव्हां पाहिलें तेव्हां मला वाटलें कीं, ह्या सामानांत ४ लग्नें तर सहजच होतील ! पुढें गुरुवारपासून सप्ताहास सुरवात झाली. पहिल्या दिवशीं

जवळ जवळ २५ माणसें फराळाचीं झालीं, आणि ५० माणसें जेवणारीं झालीं. मग हळू हळू १५०-२०० पानें झालीं. तिसऱ्या दिवशीं वाढप्यांनी वगैरे तक्रार आली. ती तक्रार आल्याबरोबर मला फार वाईट वाटलें. पण मी त्यांना सांगितलें कीं गांवांतलीं सगळीं माणसें जरी जेवलीं तरी तुम्हीं काळजी करूं नका. नंतर ती तक्रार मीं नानासाहेबांकडे न नेतां बाबांकडेच गेले आणि बाबांना सांगितलें कीं " बाबा, वाढण्याची वगैरे गडबड, उडाली आहे तेव्हां त्यांचें जरा सांत्वन करा. तेव्हां बाबा म्हणाले, " आपला अल्ला वाली आहे. " ८॥ वाजतां बाबा लेंडीवर जावयास निघाले होते. जातांना ते पाकशाळेजवळ येऊन उभे राहिले. मी पण तिकडेच होतें. त्यांनीं मला विचारलें, " बाय, इथें काय झालें ? " तेव्हां मी सांगितलें, "बाबा ! इथें ह्यांची गडबड उडाली आहे. " तेव्हां दोन्ही हात दरवाजावर टेकले, आणि कायसें पुटपुटले व निघून गेले. नंतर मी कोठीवरच्या दरवाजावर जाऊन बसलें. नंतर बाबा परत जातांना मला परत विचारलें, " बाय, तुझं काय चाललं आहे ? " तेव्हां मी त्यांना नमस्कार केला, आणि तेव्हांपासून सर्वांच्या मनांत शांतता पसरली.

हा समारंभ २१ दिवसपर्यंत चालला होता. शेवटच्या दिवशीं तर जवळ जवळ २००० पानें बसलीं ! त्या दिवशींचें पक्वान्न म्हणजे शिरा आणि खिचडी. त्या दिवशीं सर्व आचारीमंडळी दमल्यामुळें मी आणि नानासाहेबांसारखी मोठी मोठी मंडळी यांनीं वाढावयास सुरवात केली. ७-८ गांवचे भिल्ल लोक आले होते. त्यांना शिऱ्याचीं घमेलीं भरून वांटलीं.

आम्हीं थोडा शिरा खाऊन पाणी प्यालों व जावयास निघालों. तेव्हां नानासाहेबांना थोडा विनोद करावासा वाटला. कारण त्यांचा स्वभावच तसा पण अति प्रेमळ होता. नानासाहेबांनी सांगितलें " माधवराव ! अतां चंद्राबाई-जवळून कोठीची किल्ली घ्या. तेव्हां माधवराव मला म्हणाले, " आतां तुमचें काम संपलें. कोठीची किल्ली द्या. " तेव्हां मीं त्यांना सांगितलें, " मी बाबांना विचारून देईन. " नंतर ते म्हणाले, " राहिलेलें सामान मोजून द्या. " तेव्हां मीं असें उत्तर दिलें कीं, " तुम्हीं मला सामान देतांना मोजून दिलेलें नाहीं, आणि आतां मींसुद्धा मोजून देणार नाहीं. " तेव्हां नानासाहेब म्हणाले " है

गाढें मोठें जबरदस्त आहे. ती नुसती वळणारी बायको नव्हे. " दुसऱ्या दिवशीं बाबा लेंडीवर जावयास निघाले त्या वेळेस मीं त्यांना विचारलें, " बाबा, नानासाहेबांजवळ किल्ली देऊं का ?" तेव्हां त्यांनी असें उत्तर दिलें कीं, " ज्याचें त्याला द्यावें. " त्या वेळची मी पामर साईची लीला काय वर्णन करणार ! बाबांच्या समोर कुलुप काढलें आणि नानासाहेबांस सांगितलें. " राहिलेलें सामान नंदु वाण्यास परत द्या. " तेव्हां नानासाहेब विचारावयास लागले, " तुपाचे डबे किती होते ? " तेव्हां मीं म्हटलें, " आणले तेव्हांसुद्धां मीं पाहिले नाहींत आणि आतां बाकी राहिले आहेत तेसुद्धां मोजले नाहींत. ७।८ हजार पात्रें होऊनही महदाश्चर्य कीं, सर्व सामान जसेंच्या तसेंच होतें. हा घडलेला' प्रकार पाहून मला जो आनंद झाला तो काय वर्णावा सबंध दिवस मी खोलींत पडून राहिलें होतें. त्याच दिवशीं काकासाहेबांच्या बंगल्यावरून नानासाहेब बाळाभाऊ यांच्या घरीं राहावयास आले होते. मी ३ तास एके ठिकाणीं बसलेली पाहून मला नानासाहेबांनीं जो उपदेश केला तो मी जन्मभर विसरणार नाहीं. पुढें १५ दिवसांनीं बाबांना बरें वाटावयास लागलें मी " जाऊंका ? " असें विचारलें, कारण बाबा सीक होते.

तेव्हां बाबा म्हणाले गुळाची भाकर आणि लसणीचें तिखट घ्या " नंतर आपण " "उद्यां जाऊं " असें सांगितलें. म्हणून मी मोठ्या पहाटेस उठून सर्व तयारी केली पण आरतीच्या वेळीं " दुपारीं जाऊं असें " सांगितलें.

परत दुपारीं सर्व तयारी करून यमीला कडेवर घेऊन उभी होतें, आणि माझ्याजवळ सारजाबाई आणि भिमाबाई उभ्या होत्या. इतक्यांत दीड वाजतां तिकडून आले आणि त्या कृपाळू आईनें मला शेघटची भेट दिली. तेव्हां मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां " तूं कांहीं घाबरूं नकोस; मी तुझ्याच जवळ आहें " असें सांगतलें.

टिळकमंदिर रोड, पार्ले } **सौ. चंद्राबाई बोरकर.**

---

१. सत्ताहाचा हा आश्चर्यकारक प्रकार अनेकांनीं पाहिलेला आहे. म्हणून तत्संबंधीं विशेष माहीती कळविण्याविषयीं विनंती करण्यांत येत आहे. — संपादक.

# विनंति

श्रीसाईभक्तांस व इतर संतप्रेमी बांधवांस कळविण्यास येतें कीं, श्रीसाई-बाबा शिर्डी संस्थानच्या कार्यकारी मंडळाच्या विनंतीवरून ह. भ. प. दासगणू-महाराज, श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष यांनीं शिर्डी येथें श्रीसाई मंदिरापुढील पटांगणावर सभामंडपाचे कार्यासाठीं व संस्थानचा कायमनिधि जमविण्याची मोठी जबाबदारी खुशीनें स्वतः अंगा-वर घेतली आहे. सदरहू कार्याच्या उपयुक्ततेबद्दलची माहिती दासगणूमहाराज प्रचारांत प्रत्यक्ष सांगतीलच.

तरी सर्व साईभक्तांस व इतर संतप्रेमी बांधवांस नम्र विनंति करण्यांत येते कीं, त्यांनीं या कार्यास यथाशक्ति मदत दासगणू महाराजांजवळ देऊन त्याबद्दलची पावती त्यांच्याकडून घ्यावी. ज्या गांवीं दासगणूमहाराज यांस जाणें शक्य नाहीं तेथील भक्तांनीं परस्पर संस्थानचे ऑ. खजिनदार श्रीयुत रामचंद्र आ. तर्खड, १० जर मॅन्शन, वांद्रे ( मुंबई सबर्बन ) या पत्त्यावर मदत पाठवावी. मदत करणारांचीं नांवें श्रीसाईलीला मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध केलीं जातीलच. संस्थानचें कार्यकारी मंडळ दिलेल्या सर्व प्रकारच्या मदतीबद्दल देणारांचें अत्यन्त ऋणी होईल.

साई भुवन,<br>
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,<br>
मुंबई, ता. २५-८-३२.

आपला नम्र साईदास,

**सुंदरराव दि. नवलकर.**

आ. चिटणीस,<br>
श्री साईबाबा शिरडी संस्थान.

किल्ल्यासी । चिणून टाका भिंतीसी । प्राण घ्यायाकारणें ॥ ५० ॥ तईं फत्तेसिंग बालक । गेलें घाबरून देख । दीनवदनें टकमक । पाहूं लागलें सभेकडे ॥ ५१ ॥ परी जेथं अवघे तस्कर । तेथं दयेचा पाझर । कोठून सांगा फुटणार । बाळ भ्याले मृत्यूला ॥ ५२ ॥ तें पाहून ज्येष्ठ भ्राता । बोलला त्यासी तत्वतां । गांगरूं न द्यावें चित्ता । हे वत्सा ममानुजा ॥५३॥ आपण मुलें शूराचीं । श्री सद्गुरु गोविंदजीचीं । न करीं परवा मृत्यूची । येवो अथवा टळो तो ॥ ५४ ॥ आपुला आजा कुर्बाण । झाला धर्मासाठीं जाण । पित्यानेंही सेविलें रान । बाळा याच कार्यास्तव ॥५५॥ ही आपुली क्षात्रछाया । योग्य रणीं पडावया । पंढ धर्मांतर करूनियां । सुखोपभोगा भोगिती ॥५६॥ ऐसी ऐकतां बोधोक्ति । फत्तेसिंग हर्षला चित्तीं । निवटितां वुरसा निश्चिती । तवा आरसा होतसे । ॥ ५७ ॥ वजीरखान आज्ञेनीं । मुलें नेलीं दुर्गालागुनी । भिंतींत उभीं करूनी । दगड रचूं लागले ॥ ५८ ॥ कंठापर्यंत चिणून । बोलला त्यांसी वजीरखान । तुम्ही जालिया मुसलमान । प्राणदान मिळेल ॥५९॥ परी बालांचें एक उत्तर । आह्मीं न करूं धर्मांतर । सच्चिदानंद सर्वेश्वर । ठाव देईल आह्मांला ॥ ६० ॥ येणेंपरी मुलांचा । वध झाला तेथ साचा । आतां वृत्तांत गुजरीजीचा । ऐका श्रोते सांगतों ॥ ६१ ॥ गुजरीजी ह्मणें गंग्यासी । सूर्य गेला अस्तासी । अझूनि बाळकें गृहासी । कां न आलीं ह्मणोनियां ॥ ६२ ॥ मीं न सेविलें अझूनी अन्न । जा ये मुलांसी घेऊन । त्यांचेवांचून माझे प्राण । जाऊं पाहती ये वेळां ॥६३॥ माझे नातू मदीय डोळे । पंचप्राणाहून आगळे । तीं मसीं वाटती बाळें । विरह त्यांचा न साहे ॥ ६४ ॥ अपशकून होती मसीं । तणें धडकी चित्तासी । भरली आणोनि बाळें मसीं । दावीं आर्ता तात्काळ ॥ ६५ ॥ तो गंग्या कपटी खळ । मातंगहृदयी चांडाळ । बागेंत गेलीं आहेत

बाळ । शोक हृदयीं करूं नको ॥ ६६ ॥ रात्र झाली दोन प्रहर । परी न आले कुमार । ठेऊनि डोकें हस्तावर । गुडूं लागली जरीजी ॥६७॥ हाय हाय रे केशवा । सच्चिदानंद रमाधवा । माझीं बाळें माधवा । कोठें आहेत ये वेळीं ॥ ६८ ॥ तिचा आला भरून ऊर । कपाळ आपटी धरणीवर दुःखाश्रूंनीं भिजला पदर । हृदयावरील तियेचा ॥ ६९ ॥ गडबडा लोळे धरणीस । तडतडा तोडी केस । क्षणक्षणा द्वारास । पाही माता निरखुनियां ॥ ७० ॥ मध्येंच उठून उघडी द्वार । उभी राहून ओट्यावर । हंबरडा फोडून साचार । पाहती झाली मुलांना ॥ ७१ ॥ हे फत्तेसिंग जोरावर । यारे मुलांनो करून त्वरा । ताट वाढिलें मंदिरा । येऊनि बसा जेवण्यासी ॥ ७२ ॥ कडाव प्रसाद केला अजी । वाट पाहे मी तुमची आजी । म्हातारपणीं सांड माझी । नका करूं रे मुलांनो ॥ ७३ ॥ म्हातारपणीं मजप्रत । तुम्हींच दोघे आधार सत्य । या दुडदुडा धांवत । मम कंठा घाला मिठी ॥ ७४ ॥ ऐसी माता तळमळीत । हात आपटून गंग्याप्रत । शापवाणी वदली सत्य । हो वाटोळें म्हणोनी ॥ ७५ ॥ नयनींचें न तुटे पाणी । कोरडी झाली जीभ वदनीं । तों फत्तेसिंग पुण्यखाणी । प्रकट झाला ते ठायां ॥ ७६ ॥ तो दिव्य पुरुष दिव्यप्रभा । देखती झाली नयनीं माता । त्यानेंही तिच्या पदा माथां । ठेऊनि कर जोडिले ॥ ७७ ॥ माता बोलली तात्काळ । कोठें होतासी एवढा वेळ । वर्तमान सांग सकळ । जोरावर सांग कोठें ॥ ७८ ॥ फत्तेसिंग म्हणे या गंग्यांनीं । नेलें आम्हांस फसवोनी । वजीरखाना पुढें जाणी । उभे केले आम्हांला ॥ ७९ ॥ त्यानें कराया धर्मांतर उपदेश आम्हां केला फार । परि न आम्हीं तिळभर । वचन त्याचें मानिलें ॥ ८० ॥ म्हणून त्यानें आम्हांस । नेऊन बधिलें किल्ल्यास । चिणूनि टाकिलें भितीस । मेलों उभयतां बंधू आम्हीं ॥ ८१ ॥ धर्मार्थ

गेले आमुचे प्राण । तेणें आम्ही धन्य धन्य । भेटला आम्हां नारायण । सच्चिदानंद वैकुंठीं ॥ ८२ ॥ परी इच्छादेह धरुनियां । आलों वृत्त कळवावया । तुज माते या ठायां । तूंही प्राण त्यजावा ॥ ८३ ॥ ऐसें मातेस सांगून । पावले महाराज अंतर्धान । माता हताश होऊन बोलती झाली गंग्याला ॥८४॥ बरा फेडिला उपकार । तूं दुष्ट कृष्णसर्प थोर । व्यर्थ आम्ही आजवर । तुजलागीं पोशिलें ॥ ८५ ॥ हे सद्गुरु गोविंद राजा । तूं जरी पुत्र माझा । तरी सिद्धांचा आहेस राजा । वचन मोडिलें तुझें म्यां ॥ ८६ ॥ नको सोडूंस जननी घर । ऐसा उपदेश मज थोर । केला होता साचार । आनंदपुरीं पुत्रराया ॥ ८७ ॥ तें म्यां न मानिलें वचन । त्याचें फळ पावलें पूर्ण । आतां हे न धरविती प्राण । ऐसें बोलून उठली ॥ ८८ ॥ खंजीर घेऊनियां करीं । खुपसिती झाली निजोदरीं । धन्य धन्य ती भूमिवरी । सति गुजरीजी वीरमाता ॥ ८९ ॥ ज्योतीस मिळाली ज्योत । गेली सती वैकुंठाप्रत । जड देह राहिला मात्र । मृत्तिकापिंड भूमीवरी ॥ ९० ॥ ज्या किल्यांत वधिलीं मुलें । तेथें गुरुद्वार झालें । फत्तेगड नामें भलें । प्रसिद्ध या जगत्रयीं ॥ ९१ ॥ इकडे समर्थ मच्छिंद्रामी । बोलून आले लोहगडामी । पुण्य पुरुष पुण्यराशी । आपल्या शिष्यवर्गास ॥ ९२ ॥ सिरहिंदचें वर्तमान । गुरुगोविंदजी लागून । कळलें लोहगडीं जाण । धर्मसिंग द्वारानें ॥९३ ॥ तयीं गुरु म्हणती बरें झालें । यांत आपुलें काय गेलें । ज्याचें होतें त्यानें नेलें । सर्व सत्ता हरीची ॥ ९४ ॥ अविंधासी लढाया बहुत । देते झाले सद्गुरु समर्थ । तेणें अलमगीर होऊन त्रस्त । महाराष्ट्रीं प्रवेशला ॥ ९५ ॥ अविंध केला जर्जर । केवढें शिखांचें बळ थोर । खडा बंदुक कट्यार । हे देव ज्या पुरुषांचे ॥ ९६ ॥ शीख मराठे रजपुत । कांहीं थोडके द्विज सत्य । यांनींच या कलियुगांत । क्षात्रतेज दाविलें ॥ ९७॥

हेच धर्मार्थ पडले बळी । ख्याति केली भूमंडळीं । शीख मराठे रजपूत मंडळी । सेना हिंदुधर्माची ॥ ९८ ॥ ऐसा हा धर्म अजस्थान । सर्व धर्मीं प्रधान । त्या धर्मार्थ त्यागितां प्राण । वैकुंठ त्यासी रोकडें ॥ ९९ ॥ श्रीगुरुगोविंद जैसे शूर । तैसेच महात्मे उदार धीर । युद्ध बाह्यव्यापार । अंतरीं ब्रह्म ठसावलें ॥ १०० ॥ योद्धा असून महा संत । हाच येवढा जगतांत । तया माझा दंडवत । वारंवार असो हा ॥ १०१ ॥ आतां नांदेड ग्रामाची । कथा ऐका पुढें साची । स्वारी गुरुगोविंदजीची । गेली झाली दक्षिणेंत ॥ १०२ ॥ स्वस्तिश्रीसंतकथामृत । भावें परिसा श्रोते समस्त । हेंच विनवी जोडोनि हात । अत्यादरें दासगणु ॥ १०३ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

इति पंचमोऽध्यायः समाप्तः ।

# अध्याय ६ वा

श्रीगणेशायनमः ।। हे विशालभालशूर्पकर्णा ।। सिंदूरलेपन विघ्नहर्त्या गजानना । वेगें व्हावें साह्य मसीं ।। १ ।। सर्गतसिंग झाला मृत । सिरदचमकोऱ्या माजीं सत्य । धन्य धन्य तो गुरुभक्त । गेला महात्मा वैकुंठा ।। २ ।। जोरावर फत्तेसिंगासी । चिणून टाकिलें किल्ल्यामी । माय गुजरी कैलासवासी । झाली हें तुम्ही ऐकिलें ।। ३ ।। असो तें अमघें वर्तमान । शिष्य सांगती गुरुकारण । परी न शोकाकुल झालें मन । उलट आनंद मानिला ।। ४ ।। बरे झालें पुनरावृत्ती । टळली त्यांची निश्चितीं । धर्मार्थ पडले धारातीर्थीं । तेणें धन्य झाले ते ।। ५ ।। प्राण मुळींच नाशरहित । तो एक वस्तुसत । कांहीं न आपुलें जगांत । सर्व सत्ता हरीची ।। ६ ।। भ्रांतिमय मुळींच जगत । तें कैसें येईल सत्याप्रत । मूढ त्यासी मानून सत्य । नाचूं लागती दशदशा ।। ७ ।। ऐसें सांगून अपरोक्ष ज्ञान । केलें अवघ्यांचें समाधान । गुरु गोविंद धन्य धन्य । नमन माझें तयाला ।। ८ ।। शिखासहित तेथून पुढें । महाराज निघाले दक्षिणेकडे । जे आत्मज्ञानाचे पूर्ण गाढे । महा समर्थ सिद्ध योगी ।। ९ ।। महाराज बनले उचके पीर । संगें छात्र शीख शूर । तें अघटित प्रकार । काय घडला तो ऐका ।। १० ।। ठाणीं । अलमगीराचीं । मुलखो मुलखीं होतीं साचीं । त्यांत स्वारी सद्गुरुची । एका ठाण्यास पातली ।। ११ ।। तों तेथील ठाणेदार । होतो महा धूर्त चतुर । तो म्हणे न हा उचके पीर । गुरु गोविंद असावा ।। १२ ।। करूनिया वेषांतर । भटकत फिरतो भूमीवर । यास मारिल्या येथें ठार । नांव माझें होईल ।। १३ ।। त्यानें आणवून गोमांस । महाराज बोलाविले भोजनास । तें महाराज तयास । ऐशा रीतीं बोलले ।।१४।। आम्ही जवाचा एक दाणा । नित्य सेवितों सुजाणा । या आपुच्या शिष्यांनां । घेऊन जा तूं भोजनास ।। १५ ।। गनीखा मनीखा नांवाचे । होते पठाण जातीचे । दोन शिष्य महाराजांचे । त्यांना धाडिलें जेवावया ।। १६ ।। ऐशा रीतीं संकटांतून । महाराज गेले

निघून । एक पत्र लिहून । औरंगजेबा धाडिलें ॥ १७ ॥ जें वाचितां शहाचा । अंत झाला क्षणांत साचा ! त्या गुरु गोविंदजींचा । काय प्रभाव वानूं मी ॥१८॥ मागें तंटा गादीविशीं । पडता झाला दिल्लीसी । महाराजांनीं बहादुरशहासी । बसविलें शहाचे तक्तावर ॥१९॥ बहादुरशहा एके दिनीं । यमुना तटास येवोनि । राहाता झाला प्रेमानीं । ताजमहाल मंदिरांत ॥ २० ॥ जो मुमताज राणीस्तव । महाल बांधिला अभिनव । शहाजहानाचें नांव । जाहलें जगांत ज्या योगें ॥ २१ ॥ तेधवां शहाचे बरोबरी । महाराजांची होती स्वारी । तैं आगऱ्याभोंतरी । गोष्ट घडली अघटित ॥२२॥ रोशनसिंग नामें एक । आगऱ्यामध्यें होता शीख । प्रेमकुवर त्याची देख । कन्या परम रूपवती ॥ २३ ॥ जी सौन्दर्यनिधीची लहरी । कुरळ केश मस्तकावरी । मृगनयना बिंबाधरी । शुकनासिका मंदगमना ॥ २४ ॥ हिऱ्यापरी दंतपंक्ति । कटीं सिंहासम निश्चिती । परम रम्य अंगकांति । गोरोचनाचे समान ॥ २५॥ ती रमणी पाहतां । शहास झाली मदनव्यथा । हेर धाडून तत्वतां । आणिलें तीस दरबारीं ॥ २६ ॥ शहा ह्मणे मेरे प्यारी । ये बैस अंकावरी । सुरत सुखें निर्धारीं । मजलागीं तुष्टवावें ॥ २७ ॥ तेणें ती प्रेमकुवर । भयभीत मनी झाली फार । सिंहासनाचा धरून खूर । पाहूं लागली चहूंकडे ॥ २८ ॥ हाय हाय हे भक्तपाळा ॥ पांडुरंगा श्रीविठ्ठला । धर्म आमुचा रंडका झाला । कोणी न उरला वीर त्यांत ॥. २९ ॥ झाले अवघ नपुंसक । क्षात्रतेजा कलंक । लाविला यांनीं जन्मून देख । तूं तरी धांव नारायणा ॥३०॥ प्रेमकुवर म्हणे सद्गुरुसी । महाराज मारा ठार मसीं । तेणें खचित वैकुंठासी । मी जाईन निश्चयें ॥ ३१ ॥ निर्वीर झालें उर्वीतल । ह्मणून हे चांडाळ खल । तुम्हांदेखत आमुचा छळ । करूं लागले मायबापा ॥ ३२ ॥ धर्मार्थ तुमचा अवतार । मग हा निंद्य प्रकार । कैसा सहन येथवर । जाहला तुह्मांसीं कळेना ॥३३॥ तुमच्या समक्ष तुमच्या पोरी । धरून आणाव्या दरबारीं । तुह्मी बुरखा मुखावरी । काय घेऊन बसावें ॥३४॥ ऐकून तिचें हें भाषण । महाराज करिती हास्यवदनें ॥ १ ॥ तुझें पहावया मन । मौन

धरिलें वत्से मी ॥ ३५ ॥ तिजला गुरुमुखींत । महाराज ऐसें बोलले सत्य । तुझ्या पातिव्रत्याप्रत । छळावावया न इच्छीं मी ॥३३॥ मी तुझें केल्या रक्षण । शहास ऐसें वाटेल जाण । गुरुगोविंद आहे म्हणून । यांचे चाळे चालती ॥ ३७ ॥ आपुल्या धर्माची किंमत । कळली पाहिजे तयांप्रत । म्हणून तूंच आपुलें रक्षण येथ । करावें ऐसें वाटे मजला ॥ ३८ ॥ तुझा रोशनसिंग पिता । घेऊन संगें तत्वतां । शहाकडे रात्र होतां । जाय वत्से भिऊं नको ॥ ३९॥ तेथें हा अलमगीर कुमार । तुझ्या अंगा लावितां कर । तुझें रूप भयंकर । होऊन त्या तूं दिसशील ॥४०॥ तें गुरुवचन मानोनी । कन्यका शहालागोनी । म्हणे येईन होतां रजनी । तुमच्या रंगमहालास ॥४१॥ तद्दाल ऐकतां शहाला । परमावधी आनंद झाला । आली रात्र समयाला । प्रेमकुवर भेटण्यास ॥ ४२ ॥ महाकाळि येतां मंदगमनी । शहा उठला खडबडोनी । द्वयकरांस पसरोनी ।आलिंगन द्यावया सरसावला ॥ ४३ ॥ तों ती सुकुमार प्रेमकुवर । क्षणांत बनली भयंकर । दाढा जैशा नांगर । दंत जणूं फाळ त्याचे ॥४४॥ नयन जैसे प्रलयवन्ही । मुख भयंकर पसरोनी । भालीं सिंदूर चर्चोनी । धांवली शहास भक्षावया ॥ ४५ ॥ रोशनसिंग तिचा पिता । व्याघ्र होऊन तत्वतां । गुरगुरोनी अंगावरता । धांवता झाला शहाच्या ॥ ४६ ॥ तेणें शहा भयाभीत । कंप सुटला तनुप्रत । सैरावैरा सुटला पळत । ओरडूं लागला मोठ्यानें ॥ ४७ ॥ धांवा धांवा म्हणे कोणी । लागें लागली डाकिनीं । परी एकही भृत्य तया स्थानीं । नाहीं आला ओरडे जो ॥४८॥ सद्गुरूंनी आपली माया । प्रेरिली होती तया ठायां । म्हणून शहाचा ऐकावया । शब्द न आला कोणासी ॥ ४९ ॥ आपुलें कराया रक्षण । शहानें असी काढिला जाण । करामाजीं घेऊन । धांवला तिच्या अंगावरी ॥ ५० ॥ परी खड्गाचें झालें पाणी । तो प्रकार पाहोनी । बादशहा आपुले मनीं । ऐसा करी विचार ॥ ५१ ॥ आतां इलाच जावें शरण । संतूची क्षमा मागून । तरीच वांचतील माझे प्राण । नातरी मरेन मी ॥ ५२ ॥ असो प्रेमकुवरच्या पदासी । शहा शरण आला निश्चयेंसी ।

म्हणे माते या लेंकरासी । भक्षन आजीं करूं नको ।। ५३ ।। मी आलों शरणागत । हे मातोश्री तुजप्रत । मशीं जिवदान द्यावें येथ । हेंच आहे मागणें ।। ५४।। तें प्रेमकुवर पहिल्या परी । झाली श्रोते निर्धारीं । राजा पतिव्रतेवरी । डोळा तुवां न ठेवावा ।। ५५ ।। पतिव्रतांचें रक्षण । पातिव्रत्यच करी जाण । त्यासीं दुसऱ्याचें प्रयोजन । नाहीं कीं रे बादशहा ।। ५६ ।। बंदुकी भाले तलवारी । जंबीये तमंचा कट्यारी । पतिव्रता स्त्रियेंवरी । नच चालती सर्वथा ।। ५७ ।। राजसत्तेच्या जोरावरी । ऐसी अनीति कधीं न करीं । तरी कांहीं दिवस तरी । राज्यवैभव भोगशील ।। ५८ ।। तें शहाशीं मानवलें । पतिव्रतेचें महत्त्व कळलें । त्या सतीस पाठविलें । परत बोलवण करून ।।५९।। कन्यकेस आनंद झाला । वृत्त कथिलें सद्गुरुला । त्या गुरुगोविन्दसिंगाला । काय वानूं एकया मुखें ।। ६०।। असो दुसरे दिवशीं दरबारांत । महाराज बोलले शहाप्रत । मुल्ला तेवढा हातांत । द्यावा माझ्या भूपति ।। ६१ ।। ज्या मुल्लानें माझ्या पित्यासी । सल्ला दिली होती ऐसी । कीं सद्गुरु तेगबहाद्दरासी । कैद करून ठेवावें ।।६२।। परि तें न शहा मानी वचन । तेणें महाराज कोपून । देते झाले शाप पूर्ण । होवो अकल्याण म्हणोनी ।। ६३।। तुझ्या मुल्लाचा निःपात । करील माझा एक छात्र । जो वैरागी असे सत्य । भोग फळें कर्माचीं ।। ६४ ।। आपुले छात्रगण घेऊन । महाराज निघाले आग्र्यांतून । दक्षिण दिशा लक्षून । चालूं लागले श्रोते हो ।। ६५ ।। मध्यंतरी लालखान होता एक पठाण दांडगा । त्याचा वध करून निका । महाराज आले दक्षिणेंत ।। ६६ ।। भार्या तया पठाणाची । होती गरोदर तेधवां साची । पति मेल्यास स्त्रियेंची । काय विपत्ति वर्णावी ।। ६७ ।। वृत्त आतां यापुढचें । पुढल्याध्यायीं कथीन साचें । दोष दास गणूचे । पाहूं नका संत हो ।। ६८ ।। स्वस्तिश्रीसंतकथामृत । विठ्ठलाचा मुकुट सत्य । त्यांत हें गुरुगोविंद चरित । कलगी म्हणे दास गणू ।। ६९ ।। श्रीहरिहरार्पणमस्तु ।। शुभंभवतु ।।

।। इति षष्ठोऽध्यायः समाप्तः ।।

# अध्याय ७ वा

श्रीगणेशायनमः ।। जो त्र्यंबकराज गंगाधर । भाळलोचन कर्पूर-गौर । तयाच्या सव्य अंकावर । बैसला जो तो पावो नरीं ।। १ ।। मागिलाध्यायाची कथा । श्रोते तुम्ही आणा चित्ता । दीन होऊन पठाणकांता । शरण आली सद्गुरूसी ।। २ ।। तुम्ही माझा वधिला पती । अकारण निश्चितीं । आतां माझी कैसी गती । होणार सांगा दयाळा ।। ३ ।। मी आहें गर्भिणी । मशीं नोहे आधार कोणी । सप्त मास उलटोनी । गेले मशीं पुण्यवंता ।। ४ ।। मी ऐशा स्थितींत । जरी करून घेतला प्राणांत । तरी गर्भहत्या मजप्रत । लागेल कीं निश्चयें ।। ५ ।। ऐकतां तिचें भाषण । महाराज मनीं द्रवले पूर्ण । संतासमान कोणी आन । दयाळू ना भूमीवरी ।। ६ ।। ती शत्रूची जरी कांता । तरी दया उपजली सद्गुरुनाथा । शत्रुमित्र समान संतां । त्यांची हा सिद्धांत ।। ७ ।। महाराज म्हणती तियेसी । उगी न करी चिंतेसी । राहोनिया मजपासीं । आयुष्य आपुलें घालवावें ।। ८ ।। मीं तुझा मारिला पती । हें मनीं न आणि आतां । तूंही वेगळी तत्वतां । नाहींस भर्त्यापासून ।। ९ ।। तुझा भर्ता ब्रह्मांश । तूंही तशीच आहेस । बाळे आपण अवघ्यांस । ब्रह्म व्यापून राहिलें ।। १० ।। ऐसा उपदेश करोनी । घेतली तीस ठेवोनी । पुढें गोदातटालागोनी । येते झाले महाराज ।। ११ ।। ती गौतमी गंगा गोदावरी । सर्व नद्यांत जिची थोरी । गायिली पुराणांभीतरीं । वेदोनारायण व्यासानें ।। १२ ।। त्या गोदेचे नाभिस्थानीं । महाराज बैसले येवोनी । तेथें भेटले सप्त मुनी । पूर्वजन्मींचे मित्र जे ।। १३ ।। नऊ दिवस पर्यंत । ब्रह्मचर्चा झाली तेथ । अपरोक्षानुभव सत्य । सांगूं लागले एकमेकां ।। १४ ।। मुनी म्हणती

गोविंदजीसी । या गोदेच्या पवित्र तटासी । तुम्हीं रहावें अक्षयेंसी । हीच आहे विज्ञप्ती ॥ १५ ॥ पूर्व जन्मींचें आपुलें स्थान । हेंच आहे म्हणून । आग्रह तुम्हां लागून । करितों म्हणून रहाण्याचा ॥ १६ ॥ त्यासी देऊन संमती । गोदातटी गुरुमूर्ती । राहते झाले निश्चितीं । आपुल्यां शिष्यवर्गासह ॥ १७ ॥ तों एके दिनीं एक लमाण । आला गुरुदर्शनाकारण । त्यानें उत्तम दागिना घडवून । आणिला होता गुरूसाठीं ॥ १८ ॥ तो बहुमोलाचा दागिना । हिरे पाच जडले नाना । किंमत रत्नपारख्यांना ज्याची न होय सर्वथा ॥ १९ ॥ तो दागिना सद्गुरुसी । अर्पिला त्यानें प्रेमेंसी । परि तो नेऊन सरितेसी । टाकिते झाले महाराज ॥ २० ॥ तें पाहून लमाण । होता झाला मनिं खिन्न । कां हो दागिन्यालागून । सरतेमाजीं फेंकिलें ॥ २१ ॥ महाराज म्हणती तयासी । दागिना न योग्य आम्हांसी । म्हणून तो म्यां मातोश्रीसी । श्रीगोदेस अर्पिला ॥ २२ ॥ आम्ही ईश्वराचे भक्त । विटलों ऐहिक सुखाप्रत । या माळेपुढें किंमत । नाहीं तुझ्या दागिन्याची ॥ २३ ॥ ही माय माझी गोदावरी । दागिन्यांनीं भरली खरी । संशय असल्या अंतरीं । आंत पाहीं उतरून ॥ २४ ॥ त्याची प्रचिति पाहण्याप्रत । लमाण उतरला गंगेंत । बुडी मारून जळांत । दागिनें पाहूं लागला ॥ २५ ॥ तों दागिनें लक्षावधि । दिसले त्यास जळामधीं । संतवाक्य न होय कधीं असत्य श्रोते जगांत ॥ २६ ॥ हारा भरून दागिने । काढिले त्या लमाणानें । तैं सद्गुरु म्हणती कौतुकानें । यांतून ओळखा आपुला ॥ २७ ॥ लमाण म्हणे गुरुनाथा । अगाध आहे आपुली सत्ता । म्यां व्यर्थ वाहिली अहंता । मायबापा मानसीं ॥ २८ ॥ आतां मनींची शंका फिटली । गोदेची योग्यता समजली । बरें झालें माझी केली । तुम्ही कान उघाडणी ॥ २९ ॥ हारा रिचवला

गंगेंत । गुरु आज्ञेनुरूप सत्य । मग महाराज अवध्यांप्रत । बोलले ऐसें गजोंनी ॥ ३० ॥ शिष्य हो आजपासून । या स्थलाचें नामाभिधान । नगीना घाट म्हणून । म्यां ठेविलें निश्चयें ॥ ३१ ॥ ज्या कोणी नर-नारी । या नगीना घांटावरी । त्यांना दागिने मिळतील भारी । स्नानें केलिया श्रद्धेनें ॥ ३२ ॥ या श्रीगोदेचा चाकर । आहे धनपती कुबेर । धनार्थी यानें इजवर । निष्ठा मात्र ठेवावी ॥ ३३ ॥ पाप ताप आणि दैन्य । गोदादर्शनें जाय जाण । ऐसी ही पवित्र म्हणून । शंकरें धरिली मस्तकीं ॥ ३४ ॥ जो निंदील गोदेस । त्याच्या धनाचा होय नाश । विपत्ती भोगून रौरवास । जाईल तो शेवटीं ॥ ३५ ॥ निष्ठा ज्याची गोदेवरी । तो बैसेल वैकुंठपुरी । गोदाभक्ताचें श्रीहरी । दर्शन घ्याया इच्छितो ॥ ३६ ॥ तें अवध्यांनीं मानिलें । पुढें वृत्त कैसें झालें । तें ऐका सांगतों भलें । बोबड्या शब्दें श्रोते मी ॥ ३७ ॥ पठाणकांतेस पुत्र झाला । जो तारुण्यभरी भरिला । शाहतखान जयाला । लोक म्हणती श्रोते हो ॥ ३८ ॥ त्यास बोलूं लागले यवन । तूं यवन कुळांत जन्मून । आपुल्या पठाणपणा जाण । बट्टा साच लाविला ॥ ३९ ॥ तुझा पिता ज्यानें वधिला । तोच तुवां सद्गुरु केला । शीगांन फजीत आह्मांला । येणें तुझ्या दिसतसे ॥ ४० ॥ आपुल्या पित्याचें उसनें घेशी । तरी तूं तत्पुत्र निश्चयेंसी । ठार शिखाच्या गुरूसी । करीं संधी साधून ॥ ४१ ॥ ते शब्द स्वजातीयांचे । शाहेतखांसी झोंबले साचे । जैसें पर्ण कुयरीचें । लागतां आग उटे कीं ॥ ४२ ॥ आशय त्यानें आपुला । जननीस ऐका कळविला । कीं मी शिखांच्या गुरूला । वधीन माते एके दिनीं ॥४३॥ तैं माय म्हणे माझ्या सुता । तो आपला अन्न-

दाता अन्नदात्यावरीं वृथा । शस्त्र कधीं धरूं नये ॥४४॥ सद्गुरूचे उपकार आहेत आपणावरी फार । ते जन्मोजन्मीं न फिटणार । जोडे केल्या तनूचे ॥ ४५ ॥ सद्गुरुच्या कृपेंकरून । तुझें होईल कल्याण । खवळूं न द्यावें वेड्या मन गुरूच आतां पिता तुसी ॥ ४६ ॥ तें जननीचें सत्य वचन । न मानलें त्यालागून । बैसता झाला टपून । वध कराया सद्गुरूचा ॥ ४७ ॥ क्रोधाग्नि धुमसे चित्तीं । वरवर दावी शांत वृत्ति । एके दिनीं सद्गुरुमूर्ति । बैसले जप करावया ॥४८॥ ती एकांत संधि साधूना सरसावला वाहेतखान । कट्यार उदरीं खुपसून । जखम केली भयंकर ॥ ४९ ॥ तैं महाराज म्हणती शाबास । पित्याचें उसनें घेतलें खास । आणिक एक्या वारास । मजवरी त्वां करावें ॥५०॥ दोन वारांत तुझा पिता । स्वर्गीं धाडिला तत्त्वतां । तों वाहेतखां झाला करिता । वार दुसरा सद्गुरूसी ॥५१॥ परी न गेला त्यांचा प्राण वार तिसरा म्हणून । करिता झाला वाहेतखान । सद्गुरूचे अंगावरी ॥ ५२ ॥ परंतु करितां तिसरा वार । सद्गुरु कोपले अनिवार ॥ वाहेतखानाचा धरूनि कर । शिर तोडिलें तयाचें ॥ ५३ ॥ वाहेतखान पडला धरणी । शीख आले धांवोनी । गुरींदरींची पाहोनी । जखम झाले भय भीत ॥ ५४ ॥ जमवून राजवैद्यांसी । जखम शिवली वेगेंसी । पुढें कथा वर्तली कैसी । ती ऐका सावचित्तें ॥ ५५ ॥ एका धनुष्यास लावितांगुण, टांके गेले तुटोन । रक्त वाहे जखमेंतून । पहिल्या दिवसासारिखें ॥ ५६ ॥ महाराज म्हणती शिष्यांसी । आतां न आणा वैद्यासी । माझा अंत निश्चयेंसी । होणार सप्ताह झाल्यावर ॥ ५७ ॥ ग्रंथसप्ताह झाल्या पुरा । तो गुरुगोविंद योगी खरा । बोलता झाला ऐशी गिरा । आपुल्या छात्र गणासी ॥ ५८ ॥

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास =॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज ह्यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. त्यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ दीपिका**

हा नरेंद्र बुक डेपो दादर, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ८।४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ८।४; बाळकडू:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८।८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ८।२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रतल १८।० ) **द्राक्षासव** ( अर्धा रतल ८।४
दीड रतल २।८४ ) ( ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही गात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.
ट. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २
पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.